**सह दिवाणी न्यायालय, तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग परंडा यांचे न्यायालयात**

**नि.फौ.ख.क्र. १४५/२०२५.** **निशाणी क्र.२१**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ ची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | रोहन महादेव लोहार, |
| वय | – | २३ वर्षे, |
| व्यवसाय | – | गॅरेज, |
| राहणार | – | बावची चौकाजवळ परंडा ता. परंडा जिल्हा उस्मानाबाद. |

**सरतपासणी सहा. सरकारी वकील श्री.व्ही.एस.भादुले साहेब यांचे मार्फत –**

दिनांक २४.०७.२०२५ रोजी माझ्या समक्ष कुठलाही पंचनामा झाला नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी क्र. २ वर सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही.

**सरकारी वकीलांनी पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली – मंजूरः–**

हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २४.०७.२०२५ रोजी पोलीसांनी मला पाचपिंपळा रोडवरील सरस्वती बाबुशा गायकवाड यांच्या जागेजवळ बोलाविले होते. त्या ठिकाणी विष्णु कोकणे यांनी घटनास्थळ दाखविले. हे मला माहित नाही की, त्या प्रमाणे पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, त्या पंचनाम्यावर वाचुन सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी न वाचता सही केली असे खोटे सांगतो. मी आरोपीस ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीच्या सांगण्यावरुन आज खोटी साक्ष देत आहे.

**शासन वि. गुरफान व इतर  नि.फौ.ख.क्र. १४५/२०२५**

दिनांक २७.०७.२०२५ रोजी माझ्या समक्ष कोणताही जप्ती पंचनामा झाला नाही. आता मला पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गुफरान याने बजाज कंपनीची एम.एच.–१३–यु–३२१३ या क्रमांकाची मोटार सायकल पोलीस स्टेशनला हजर केली व पोलीसांनी तिचा जप्ती पंचनामा माझ्या समक्ष केला. हे म्हणणे खरे नाही की, त्या पंचनाम्यावर वाचुन मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मदत करण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे श्री. एस.एस.जाधव वकील यांनी नाकारला.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2026.04.16 17:15:07 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–१६.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा.